REVIEW OF RESEARCH
IMPACT FACTOR : 5.7631(UIF) UGC APPROVED JOURNAL NO. 48514 ISSN: 2249-894X
VOLUME - 8 | ISSUE - 3 | DECEMBER - 2018

# लिंगभाव आणि धार्मिक आचारसंहिता
**(Gender and Religious Ethics)**



**मिलिंदकुमार खेळकर**
**सहाय्यक प्राध्यापक, समाजशास्त्र विभाग,**
**डॉ. आंबेडकर कॉलेज, दीक्षाभूमी नागपूर.**

## सारांश

धर्म आणि संस्कृती यांच्यात मोठ्या प्रमाणात सहसबंध आहे. जेव्हा एखाद्या विशिष्ट संस्कृतीतील लोक विशिष्ट धर्म स्वीकारतात तेव्हा त्यांची संस्कृती त्या धर्मात स्वीकार्य असलेल्या आचारप्रणालीला आणि प्रथांना आत्मसात करू लागते. तसेच जेव्हा विशिष्ट धर्म एखाद्या विशिष्ट संस्कृतीमध्ये स्थापित होतो आणि रुजतो, तेव्हा त्या धर्माची आचारसंहिता,धार्मिक कार्मकांड व्यवस्था आणि नीतिमत्ता यासारख्या बाबी सामान्यतः त्या संस्कृतीच्या तत्त्वांवर आधारित असतात. अशाप्रकारे, धर्माचा त्या त्या समाजाच्या संस्कृतीवर आणि संस्कृतीचा धार्मिक अचारप्रणालीवर प्रभाव पडत असतो. पितृसत्ताक आणि पुरुषकेंद्रित संस्कृती असणाऱ्या समाजामध्ये केवळ राजकारण आणि व्यापारातच नव्हे तर धार्मिक आणि सामाजिक जीवनातही स्त्रियांपेक्षा पुरुषांना अधिक पसंती देण्यासाठी भूमिका आणि दर्जाच्या निश्चितीमध्ये स्त्री आणि पुरुष या जैविक भेदाला श्रेष्ठ आणि कानिष्ठत्वाचा आधार दिल्या गेला आहे. जगातील विविध धर्मांच्या धर्मसंहितेत पुरुष आणि स्त्रियांच्या अधिकार, वागणूक ,कर्तव्ये इत्यादीबाबत भेद्भावमूलक बाबी असलेल्या स्पष्टपणे दिसतात. या संशोधन कार्याचा उद्देश विविध धर्मांच्या अध्यात्मिक मुल्यांवर प्रकाश टाकण्याचा नसून विविध धर्मांच्या आचारसंहिता आणि व्यवहारपद्धतीवर लिंगभावाचा कसा प्रभाव पडला हे अधोरेखित करण्याचा आहे.

**अतिमहत्वाचे शब्द (Keywords) :** लिंगभाव, धार्मिक आचारसंहिता, धार्मिक , पितृसत्ताक, भूमिका .

## प्रस्तावना (Introduction)

स्त्री आणि पुरुष या दोघांमध्ये धार्मिक बांधीलकीबाबत भेद का आहे हा शेकडो वर्षापासून वादाचा विषय आहे. आज देखील या भेदाबाबत वेगवेगळे विचारवंत आणि सामाजिक संशोधक आपापली मते मांडत असतांना दिसतात.. या मतांमधून आणि वादविवादातून एक बाब निश्चितपणे समोर येते आणि ती म्हणजे जगातील बहुतांश धर्माचे संस्थापक हे पुरुष आहेत आणि बहुतांश धर्माचे ग्रंथ आणि त्यातील संहिता या मुख्यता पुरुषांकडे झुकलेल्या किंवा स्त्रियांपेक्षा पुरुष्यांच्या वर्चस्वाला आणि श्रेष्ठत्वाला मान्यता देणाऱ्या दिसतात. त्यामुळे जगातील बहुतांश समाजात पुरुषांच्या तुलनेत स्त्रियांना जीवनाच्या प्रत्येक क्षेत्रात दुय्यम वागणूक मिळत असल्याचे दिसते. कोणत्याही समाजातील धार्मिक आचारसंहिता व पर्यायाने होणारी वर्तणूक ही जर स्त्री आणि पुरुष यांच्यात भेदभाव करणारी असेल तर त्याला धर्मातील लिंगाधिष्ठीत भेदभाव

(Discrimination in Religion) असे म्हणता येईल. धार्मिक तत्वांचा ज्याप्रमाणे समाजाच्या संस्कृतीवर प्रभाव पडतो त्याचप्रमाणे समाजाच्या संस्कृतीचा,त्यातील घटकांचा धार्मिक तत्वांवर, आचार साहिन्तेवर देखील प्रभाव पडत असतो. म्हणूनच अनेक धार्मिक तत्वांमध्ये महिलांना दुय्यम स्थान देण्यात आलेले दिसते.

## लिंगभावाची संकल्पना आणि अर्थ (Concept and Meaning of Gender )

लिंग आणि लिंगभाव यामध्ये फरक आहे. लिंग ही जीवशास्त्रीय संकल्पना आहे तर लिंगभाव ही सामाजिक-सांस्कृतिक संकल्पना आहे. लिंग या संकल्पनेतून प्राणी, पक्षी , वनस्पती इत्यादीमधील नर आणि मादी , स्त्री आणि पुरुष यामधील फरक लक्षात येतो . यात श्रेष्ठत्व आणि कनिष्ठत्व अभिप्रेत नसते. परंतु लिंगभाव ही सामाजिक-सांस्कृतिक संकल्पना असल्यामुळे यातून मात्र श्रेष्ठत्व आणि कनिष्ठत्व हा भाव व्यक्त होतो.

स्त्रिया आणि पुरुष यांच्या शरीररचनांमध्ये फरक आहे, पण समाजामध्ये स्त्रिया आणि पुरुषांबाबत जे भेदभाव केले जातात, त्या भेदभावाचे कारण आपल्याला त्यांच्या शारीरिक फरकांमध्ये सापडेलच असे नाही. लिंग हे शारीरिक आहे तर लिंगभाव समाजात घडवला जातो. स्त्रिया आणि पुरुषांना विशिष्ट प्रकारे वाढवले जाते; यात स्त्रियांनी व पुरुषांनी कसे वागावे हे शिकवले जाते. ह्याच स्त्रीत्व आणि पुरुषत्व ह्या कल्पना होत. ह्या कल्पना माणसांच्या वागणुकीवर खोलवर प्रभाव टाकतात. स्त्रीत्व आणि पुरुषत्वाच्या रूढ कल्पना ह्या स्त्रिया आणि पुरुषांना साचेबद्ध करून एकमेकांविरुद्ध उभे करतात. उदा. स्त्रीने सहनशील, नम्र असावे, आज्ञाधारक असावे, सर्वांशी जुळवून घ्यावे अशी अपेक्षा असते. तर पुरुषांना आक्रमक बनायला मुभा असते. ह्या कल्पना स्त्री-पुरूषांवर अवास्तव ओझे लादतात. एखादी स्त्री जोरजोरात बोलली, हसली तर तिच्याकडे पुरुषी म्हणून बघितले जाते. घरकाम, चूल-मूल ही बाईची जबाबदारी तर घराबाहेरच्या जबाबदाऱ्या पुरुषाच्या मानल्या जातात. मुलींना लहानपणी खेळायला बाहुली, भातुकली तर मुलांना सायकल, कार, बंदूक अशी खेळणी दिली जातात. प्रौढ वयात येणाऱ्या जबाबदारीचे प्रशिक्षण लहान वयातच सुरू होते. स्त्री-पुरुषामधला शारीरिक फरक हा प्रामुख्याने त्यांच्या पुनरुत्पादनासंदर्भातील भिन्न जबाबदाऱ्या हा आहे. पुरुषाकडे रेतन तर स्त्रीकडे गर्भारपण, बाळंतपण आणि स्तनपान अशा प्राकृतिक जबाबदाऱ्या आहेत मात्र या पलीकडे कोणतीही कामे स्त्री/पुरुष कोणीही करू शकतात. उदा. स्वयंपाक, घरसफाई, शिवण-टिपण, शेतातले काम, डॉक्टर, नर्स, इंजिनिअर, शिक्षक इ.इ. मात्र घरकाम आणि बालसंगोपन ह्या आजही स्त्रीच्याच प्राथमिक जबाबदाऱ्या मानल्या जातात. इतक्या की बाहेरच्या जगातही स्त्रियांना बहुतेकदा घरकामाची विस्तारीत कामे मिळतात उदा. शिक्षिका, नर्स, स्वागतिका अशा प्रकारच्या कामात स्त्रियांचा अधिक भरणा असतो. या लिंग भावाचा उल्लेख जेंडर असाही केला जातो. थोडक्यात असे म्हणता येईल की लिंगभाव म्हणजे स्त्रियांचा वेगळा विचार नव्हे तर लिंगभाव म्हणजे एखाद्या समाजातील स्त्रिया आणि पुरुषांची सापेक्ष सामाजिक स्थिती होय.

अशा तऱ्हेने लिंगभाव हा सामाजिक -सांस्कृतिक संरचनातून घडवला जातो उदा. जात, धर्म, वय इ. वेगवेगळ्या संस्कृतींनुसार लिंगभाव बदलत राहतो. पुरुषप्रधान समाजात लिंगभावाची जडणघडण पुरुषांना झुकते माप देणारी असते आणि तुलनेने स्त्रियांना पक्षपाताला अधिक तोंड द्यावे लागते. पुरुष कुटुंबप्रमुख, पुरुषाकडे मालमत्तेची मालकी, लग्न झाल्यावर स्त्रियांनी सासरी जाणे, पितृवंशीय व्यवस्था ह्या सामाजिक प्रक्रिया आपली समाजव्यवस्था पुरुषप्रधान असल्याचे दर्शवतात. अशा समजात स्त्रीचे स्थान दुय्यम बनते. ह्याचा एक गंभीर

परिणाम म्हणजे स्त्रियांवर होणारे अत्याचार. बहुतेकदा स्त्रियांना आपल्या दुय्यम स्थानामुळे अत्याचारांना तोंड द्यावे लागते. धार्मिक बाबतीतही पुरुषांना श्रेष्ठत्व तर स्त्रियांना गौणत्व प्राप्त झालेले आहे.

## धार्मिक आचारसंहिता आणि आचरण

सामान्य शब्दात, आचारसंहिता म्हणजे एखाद्या व्यक्तीला निर्देशित आणि नियंत्रित करणारी नियामनांची व्यवस्था. किंवा मानवी कृतीला योग्यतेशी किंवा अयोग्यतेशी जोडणारी नियामांची चौकट म्हणजेच आचारसंहिता होय.

डिक्शनरी नुसार, 'देवावरील श्रद्धा आणि त्यासाबंधीचे विधी किंवा कर्मकांड म्हणजेच धर्म होय.'. विशिष्ट ईश्वरावर श्रद्धा ठेवून त्यावर आधारित तत्वप्रणाली, जीवनप्रणाली असणे म्हणजे धर्म होय. आदिम काळापासून मनुष्याची नैसर्गिक प्रवृत्ती आहे, की जे काही गूढ आहे, अगम्य आहे आणि जी एक अनामिक शक्ती या विश्वात आहे, त्यावर विश्वास ठेवायचा. त्याची पूजा-अर्चना करायची. मग ती निसर्ग देवता असो, अथवा देवतेचे मूर्त स्वरूप असो किंवा देवाची आराधना करायची एखादी जागा असो, मनुष्यातील शक्ती, सृजनशीलता, नवनिर्मितीची शारीरिक आणि मानसिक क्षमता असो. कोणासमोर नतमस्तक व्हायचे याचे स्वरूप वेगवेगळे; पण उद्देश एकच, त्या शक्तीने, देवाने आपले भले करावे, आयुष्यात दु:ख कमी द्यावे किंवा देऊच नये किंवा येऊ घातलेले दु:ख हरावे आणि आपल्या साऱ्या मनोकामना पूर्ण व्हाव्यात. धर्मानुसार आचरण केल्याने मोक्ष प्राप्ती होते आणि जन्म-मरणाच्या फेऱ्यातून मनुष्याची सुटका होते, असा सार्वत्रिक समज किंवा विश्वास देवावर, धर्मावर श्रद्धा ठेवणाऱ्यांमध्ये असतो. धार्मिक आचारसंहिता या त्या त्या धर्माच्या धार्मिक ग्रंथात सूचीबद्ध केलेल्या असतात उदा, बायबल, कुराण,त्रिपिटक, गुरुग्रंथ साहिब,इत्यादी तर काही वेळा त्या परंपरेने चालत आलेल्या दिसतात उदा. आदिवासींच्या धार्मिक संहिता किंवा कर्मकांड.

## धार्मिक आचारसंहिता आणि व्यवहार यामध्ये लिंगभाव प्रतिमान

**(Gender Pattern in Religious Ethics and Practices)**

काही उपलब्ध आकडेवारीनुसार (Beit-Hallahmi and Argyle, 1997; Pew Research Center, 2014), स्त्रिया या पुरुषांपेक्षा जास्त धार्मिक असतात, विशेषता ख्रिस्चन धर्मीय स्त्रिया. हे तेव्हा घडते आहे जेव्हा बहुतांश धर्माचे संस्थापक हे दिव्य पुरुषच आहेत उदा. अब्राहम, मोझेस, गौतम बुद्ध, येशू ख्रिस्त, मोहम्मद पैगंबर इ.

'पीव रिसर्च सेंटर' ने 2008 ते 2015 दरम्यान 192 देशांमध्ये विविध धर्मीय लोकांच्या केलेल्या संशोधनामध्ये असे दिसून आले की, पुरुषांपेक्षा स्त्रियामध्ये धर्माबाबत बांधिलकी जास्त प्रमाणात असते, त्या जास्त धार्मिक वृत्तीच्या असतात. धार्मिक संशोधक असे म्हणतात की, याला कारण 'नैसर्गिकता' आणि 'संगोपन' हे दोन घटक जबाबदार आहेत. बेट-हलहामी आणि अर्जील यांनी 1997 मध्ये केलेल्या संशोधनात हे मान्य केले आहे कि, अ) स्त्रिया या पुरुषांपेक्षा अधिक भावनाशील असतात आणि म्हणून दोष ,पश्चाताप किंवा कृतज्ञतेच्या प्रसंगी धार्मिकतेकडे वळतात. ब) स्त्रियांचे सामाजीकरण हे धार्मिक मूल्यांनुसार होते तर तुलनेने पुरुषांचे फारच कमी. क) स्त्रिया या धर्माकडे सामाजिक संरचनेचा एक नैसर्गिक परिणाम म्हणून बघतात तर पुरुषमात्र फारच कमी प्रमाणात तसे बघतात.

वरील उल्लेखित काही संशोधनाचे अपवाद मान्य केले तरी धार्मिक संघटनाचे संचालन, नियंत्रण ,धार्मिक शिक्षण आणि पूजा-पाठ या सर्व गोष्टींमध्ये स्त्रियांपेक्षा पुरुषांचेच प्रभुत्व राहत आलेले आहे.

एकेश्वरवादी आणि बहुदेववादी अशा दोन्ही प्रकारच्या धर्मात लिंगभाव प्रकर्षाने दिसून येतो. एकेश्वरवादी ख्रिस्चन धर्मात 'ट्रिनीटी' तील दुसरी व्यक्ती म्हणून केवळ एकच पुरुष मसीहा अवतीर्ण झाला आणि तो म्हणजे येशू ख्रिस्त. इतर दोघे, 'फादर' आणि पवित्र आत्मा' यांना पुलिंगी ऐवजी नपुसकलिंगी मानले जाते. बायबल नुसार,पहिली महिला, 'इव्ह' हीला पहिला पुरुष आदमच्या बरगडी पासून तयार करण्यात आली. ज्यू आणि ख्रिस्चन धर्मीय लोक बरेचदा पितृसत्ताक पद्धतीचा बचाव करण्यासाठी या उदाहरणाचा दाखला देतात. दुसरीकडे, इस्लाम मध्ये मात्र आदम आणि हव्वाह(इव्ह) यांच्या उत्पत्तीबाबत स्पष्ट असे काहीही सांगितलेले नाही.

ज्यू,ख्रिस्चन आणि इस्लाम या धर्मांचे संस्थापक व प्रमुख वारसदार पुरूषच आहेत, ते असे, यहुदी(ज्यू) धर्मात अब्राहम, मोझेस, डेविड ,इलीजाह इ., ख्रिस्ती धर्मात जोन बाप्तीस्त,येशू ख्रिस्त आणि त्याचे शिष्य आणि पाल , इस्लाम धर्मात मोहम्मद पैगंबर आणि त्याचे वारसदार अबू बकर,उथमानिब्न अफान, ली नीब्न अबी तालिब आणि बारा इमाम . हे सर्व पुरुषच आहेत. हे सर्व धर्म पितृसत्ताक संस्कृतीत स्थपित झाले कि ज्यामुळे त्यांची आराधना तसेच संचालन आणि नियंत्रण पुरुषांपुरतेच मर्यादित झाले, ख्रिस्चन समुदाया मध्ये चर्च फादर आहे , चर्च मदर मात्र नाही. याला अपवाद फक्त कॅथोलिक चर्चमधील महिला संतांचा. अधिपासुंन धर्मासाठी कार्य करणाऱ्या पुरुष धर्मप्रसारकांच्या तुलनेत महिला धर्म प्रसारकांच्या कामाची तेवढी दाखल घेतली जात नाही आणि त्यांना प्रसिद्धीही दिली जात नाही. आपल्या दोन हजार वर्षाच्या कालखंडात कॅथोलिक चर्चने एकही महिलेला पोप पद दिले नाही. पितृसत्ताक समाजात केवळ पुरूषच प्रबुद्ध-ज्ञानवंत होऊ शकत होते आणि महिला मात्र इतिहासही घडवू शकत नव्हत्या आणि संस्कृतीसाठी काही देऊही शकत नव्हत्या असे खेदाने म्हणावे लागते. महिलांना धर्मच काय तर सामाजिक, आर्थिक, राजकीय इ बाबतीत कोणतेही अधिकार नव्हते . स्त्रीवादी लोकांच्या दबावामुळे अगदी 19 व्या शतकापासून महिलांना काही अधिकार द्यायला सुरुवात झाली.

पारंपारिक ज्यू धर्मीय लोकांत दर्जा श्रेणीमध्ये महिलांना असणार्या संधी नाकारल्याच जात नाही तर त्यांना हीन पानाची वागणूक दिली जाते. 'लक्ष विचलित करणाऱ्या वस्तू' म्हणून प्रार्थनेच्या वेळी महिलांना पडदा किंवा भिंत याद्वारे पुरुषांच्या नजरेपासून दूर ठेवले जाते

इस्लाममध्ये महिलांना इमाम किंवा धर्मगुरू होता येत नाही. ज्यू प्रमाणेच इस्लाम धर्मीय स्त्रियांनाही लक्ष्त विचलित करणाऱ्या वस्तू समजून प्रार्थना आणि उपासनेच्या प्रसंगी त्यांना पुरुषांशी कोणत्याही प्रकारची आंतर्क्रिया करण्याची परवानगी नाही. एवढेच नव्हे तर कुराननेही त्यांना थेट असे कोणतेच अधिकार दिलेले नाहीत त्यांना इस्लामिक धर्मगुरूंच्या फतव्या नुसार, महिलांनी अत्तर लावणे, नेल पौलिश लावणे, लिपस्टिक लावणे म्हणजे पुरुषांच्या लैंगिक भावना चाळवणे होय असे म्हटले जाते. नमाज पठण हा प्रामुख्याने पुरुषांचा मक्ता मनाला जातो, महिला बुरखा घालून पुरुषांच्या मागे राहून किंवा दुसर्या खोलीमध्ये नमाज पठाण करतात. इस्लामिक संहितेद्वारे प्रार्थना आणि सामाजिक जीवन यात स्त्री आणि पुरुषांमध्ये आंतर्क्रिया किंवा संवादाच होणार नाही याची पुरेपूर काळजी घेण्यात आली आहे. अफगाणिस्तान सारख्या देशात महिलांनी एकटीने घराबाहेर पडणे, शिक्षण घेणे, नोकरी करणे, खेळ खेळणे इ. वर बंदी घातली आहे. 25 सप्टे. 2011 ला सौदी अरेबियाचे राजे अब्दुल्लार यांनी महिलांना मतदान आणि निवडणुकीत उभे राहण्याचा अधिकार देण्याची घोषणा केली तेव्हा जगणे त्या चे स्वागत केले पण अजूनही काही देशात असे अधीकार नसल्या बाबत काहींनी आश्चर्य ही व्यक्त केले. मुस्लीम धर्मात मुस्लीम व्यक्ती मुस्लीम, ज्यू आणि ख्रिस्चन धर्मीय मुलीशी विवाह करू शकतो पण मुस्लीम मुलगी मुस्लीम व्यक्तीशिवाय अन्य कोणाशी विवाह करू शकत नाही.

पतीच्या साध्या तीन तलाक म्हटल्याने मुस्लीम स्त्रीचा विवाह तुटतो. हिंदू धर्मात देखील शुद्र, पशु आणि नारी हे तदानाचे अधिकारी म्हटले आहे ,मासिक पाळीमुळे महिलांना मंदिरात जाण्याचा मज्जाव केला जातो. सतीप्रथा , केशवपन , बालहत्या, शिक्षण बंदी ,विधवा पुन:र्विवाह बंदी इ धार्मिक रूढी होत्या ज्या काळाच्या ओघात नष्ट होत व्चालाल्या आहेत. आजही महिलांना धर्मगुरू होता येत नाही.

एकंदर, धार्मिक जीवनात महिलांना पत्नी, आई आणि घर सांभाळणारी या भूमिकेतच पाहावे लागते.

## निष्कर्ष

धार्मिक आचारप्रणाली आणि प्रथा ह्या समाजातील सर्व लोकांची अभिवृत्ती आणि वर्तनावर प्रभाव पाडतात. धार्मिक प्रथा संस्कृतीला आकार देतात आणि संस्कृती धार्मिक प्रथांना आकार देते

धर्मानुसार आचरण म्हणजे मोक्षाचा राजमार्ग. पुरातन धर्मकारांच्या मतानुसार स्त्रीजातीला मोक्ष नाहीच. थोडक्यात, स्त्रीचा एक माणूस म्हणून विचार धर्मकारांनी केलेला नाही. स्त्रीचे शारीरिक वेगळेपण तिच्या मोक्ष मार्गाच्या आड येते. तिला एकतर देवी, माता अशा उच्चपदावर ठेवायचे किंवा पुरुषाला मोहात पाडणारी, म्हणून तिच्या अस्तित्वाला दुय्यम ठरवून, हीन दर्जाचे आयुष्य जगण्यास भाग पाडायचे. धर्माच्या नावाने स्त्रीविश्वाचा आवाका संकुचित करण्यास धर्मकारांनी, धर्मगुरूंनी, समाजाने आणि कुटुंबियांनी कुठलीही कसर ठेवली नाही. शतके लोटली, स्त्रिया धर्माच्या सावलीत घुसमट सहन करीत राहिल्या. ही सावली सुखावह नव्हे हे निश्चित.

## संदर्भ


1. Argyle, M. & Beit-Hallahmi, B. The Psychology of Religious Behaviour, Belief and Experience. New York: Routledge, 1997.BBC NEWS. 25 September 2011. “Women in Saudi Arabia to vote and run in elections.” Retrieved on 19/11/2017 from: www.bbc.com/news/world-us-canada-15052030
2. Beauvoir, S. The Second Sex. Trans., & edited by H. M. Parshley. New York: Alfred A. Knof, Inc., 1952.
3. Boyarin, D. “Gender.” in M. C. Taylor (Ed.). Critical Terms for Religious Studies. Chicago: University of Chicago Press, 1998.
4. Butler, J. Gender Trouble: Feminism and the Subversion of Identity. New York: Routledge, 1990.
5. __________,“Critical Theory”. Retrieved on18/11/2017 from:https://my.vanderbilt.edu/criticaltheoryfall13/2013/judith-butler-on-gender-as-performed-or-performative/
6. Fenstermaker, S. and West, C. Doing Gender Doing Difference: Inequality, Power and Institutional Change. New York: Routledge, 2002.
7. Kilkenny, A. (2011). “God Hates Women.” Retrieved on 20/11/2017 from: https://m.huffpost.com/us/entry/56984
8. Krijnen, T. and van Bauwel, S. Gender and Media: Representing, Producing. New York: Routledge, 2015.